4. We submitted a copy of Legal Notice to UGC Secretary Dr. N. Kazmi and had a brief discussion with her. We also met the Section Officer Ms. Rita Goel and received some information from her. **At this office we also met Prof. V. R. Nikam who had come as per MFUCTO's decision to serve the original copy of Legal Notice.**

5. Since we knew that a UGC meeting was to take place on 4th May'10, we had planned to stay in Delhi till evening of 5th May'10.

6. Our second visit to UGC office was on 5th May afternoon. We were unable to meet the UGC Secretary as she was busy in meetings. We met Ms. Rita Goel briefly to know the developments. We also met UGC Joint Secretary Mr. Dongre and had informal discussion with him for about 40 minutes. On both occasions, UGC Chairman was not in Office.

7. We are giving below an account of what transpired during our discussions with UGC officials in the two visits :-

i) The UGC Secretary explained that MHRD's Order to UGC to stall implementation of decision taken in the meeting of 23rd February'10 regarding giving exemptions to non-NET/SLET teachers, is under Sec 20. In case of a conflict in views of UGC and MHRD, Sec 20 binds UGC to follow MHRD's view. Hence, in the present situation UGC has no option but to follow the MHRD Order.

ii) The Joint Secretary, Mr. Dongre, reiterated UGC's position as explained earlier by the Secretary. He informally discussed what transpired in the UGC meeting held on 4th May'10 which went on for several hours due to the contentious issue of MHRD order. In the meeting, the Commission members were informed about the Legal Notice served by MFUCTO and this notice has been sent for legal advice as per instructions of the Chairman.

iii) Mr. Dongre further informed that there is no option but to withdraw exemptions granted on 23rd Feb'10. However this action will follow 4th Amendment to UGC Regulations 2000 dated 4/4/2000, amending (withdrawing) second proviso of Clause 2. This process may take 15 – 20 days. **At the same time, exemptions granted prior to 23/2/2010 "will be honoured".**

iv) We were informed that in the meeting concerns were raised about the legal implications that will emerge including problem of appointing teachers in subjects for which NET/ SLET examination is not conducted.

v) **Thus there will be two groups of teachers: (i) those who obtained exemption prior to 23/2/2010 - an artificially created cut-off date; and (ii) those who were either granted exemption on 23/2/2010 or whose cases were yet to be decided by the Exemption committee**.

vi) Section Officer informed that Exemption committee meetings were held in June, July and August, 2009. Hundreds of cases, including those from Pune, were cleared in meetings held in June and July. These cases were put up in the UGC meeting on 23/2/2010.

vii) However, cases considered in August, 2009 could not be cleared since Mr. Saharia (Secretary, Higher Education Dept. Maharashtra) was present. His misleading and aggressive intervention (papers obtained under RTI from UGC highlight this fact) pressurized Exemption committee to stall the entire process.

viii) It is pertinent to point out that cases put up in the August meeting, were mainly from Mumbai and Aurangabad and hence were in the pipeline to be cleared after 23/2/ 2010.

ix) **The UGC officials privately agreed that the present situation will lead to, both, inter-University and intra- University discrimination. Tremendous tension was visible.**

8. Based on above observations, we propose that:

**"MFUCTO should resolve to begin a new phase of Movement to get justice for NET/ SLET affected teachers. This phase should have two dimensions:**

**(a) A fresh Legal battle against MHRD and**

**(b) A grass root movement culminating in Mass Demonstration by thousands of affected teachers before the Parliament in the Monsoon session"**

sd/ sd/

**Dr.Tapati Mukhopadhyay Dr.Madhu Paranjape**

**Members of MFUCTO Executive Committee**

** AF : P 75 **

तात्काळ

**महाराष्ट्र शासन**

*उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०००३२.*

*क्रमांक : संकीर्ण-२००९/(३५९/०९)-विशि -१,*

*दिनांक : १ सप्टेंबर, २००९.*

प्रति,

कुलगुरु, सर्व विद्यापीठे.

विषय : संपावर असलेल्या अध्यापकांविरुद्ध शिस्तभंग विषयक कार्यवाही करणेबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतचे शासनाचे समक्रमांकाचे दिनांक २४ ऑगस्ट, २००९ चे पत्र मागे घेण्यात येत आहे.

आपला

**(रा.गो. जाधव)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक त्या कार्यवाहीसाठी : (१) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे. (२) सर्व सहसंचालक (उच्च शिक्षण) यांनी त्यांचे स्तरावर योग्य ती कार्यवाही करावी व शासनास अहवाल पाठवावा.

** AF : P 91 **

# प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांच्या विरोधात विशेष हक्कभंगाची सूचना

**दिनांक : २५ मार्च २०१०**

**मा. सभापती,**
महाराष्ट्र विधान परिषद
विधान भवन, मुंबई.

**विषय :** प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांच्या विरोधात विशेष हक्कभंगाची सूचना.

**ज्याअर्थी,** "**मानव संसाधन विकास विभाग (एच.आर.डी.) मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोग (यु.जी.सी.) जे आदेश काढील त्याचे महाराष्ट्र शासन पालन करील.**" "**विद्यापीठ अनुदान आयोगाकडून शिफारस आल्यानंतर, केंद्र सरकारकडून आदेश दिले जातील त्या आदेशांचे पालन केले जाईल.**" अशी सुस्पष्ट आश्वासने ***(सहपत्र : एक)*** दिनांक २९ डिसेंबर, २००८ रोजी विधानपरिषद सभागृहात देण्यात आलीत व त्याप्रमाणे "**दि. २३ जुलै २००९ च्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत निर्णय घेण्यात आला. मंत्रिमंडळाच्या सदर निर्णयानुसार सुधारित वेतन संरचनेबाबत दिनांक १२ ऑगस्ट २००९ रोजी शासननिर्णय *(सहपत्र : दोन)* निर्गमित करण्यात आला आहे.**" असे मा. उच्च शिक्षण मंत्र्यांनी दिनांक २२ डिसेंबर २००९ रोजी विधानपरिषदेत केलेल्या निवेदनात ***(सहपत्र : तिन)*** नमूद केलेले आहे. १२ ऑगस्ट २००९ च्या या शासननिर्णयाप्रमाणे विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सर्व वेतनश्रेण्या आश्वासित प्रगतीयोजनेसह (CAS) राज्यात महाराष्ट्र शासनाने जशाच्या तशा लागू केल्या, असे असतांना प्रधानसचिव उच्च शिक्षण यांच्या निदेशानुसार एका अधिकाऱ्याने **दिनांक २४ जुलै २००९ रोजी आंदोलनकर्त्या महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना एक पत्र*(सहपत्र : चार)* लिहून असे कळविले की, "राज्य मंत्रिमंडळाने २३ जुलै २००९ रोजी विचार करुन राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे दिनांक १ जानेवारी २००६ पासून सहावा वेतन आयोग लागू करण्याबाबत निर्णय घेतला आहे.**" राज्य शासकीय कर्मचाऱ्यांच्या बाबतचा सहावा वेतन आयोग वेगळा आहे आणि यु.जी.सी.चा सहावा वेतन आयोग वेगळा आहे, ही वस्तुस्थिती आहे, राज्य शासकीय कर्मचाऱ्यांना ग्रेड पे आहे आणि यु.जी.सी. मध्ये ॲकॅडमिक ग्रेड पे आहे. ग्रेड पे आणि ॲकॅडमिक ग्रेड पे सर्व ठिकाणी वेगवेगळे आहेत. ***(सहपत्र : सात)*** पे बॅण्डसुध्दा काही ठिकाणी वेगवेगळे आहेत. सभागृहातील आश्वासनांच्या विरोधात व मंत्रिमंडळाच्या निर्णयाच्या विरोधात दिनांक २४ जुलै २००९ रोजी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना पाठविलेल्या पत्रातील उपरोक्त उल्लेख ***मंत्रिमडळाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना करणारा, शासननिर्णयात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा, सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा आहे, आणि;***

**ज्याअर्थी,** याच अधिकाऱ्याने दिनांक ३१ जुलै २००९ रोजी दुसरे पत्र ***(सहपत्र : पाच)*** लिहून महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना राज्य शासनाने "राज्यातील विद्यापीठे व महाविद्यालये/संस्था यामधील शिक्षक व इतर समकक्ष पदांना केंद्र शासनाप्रमाणे (यु.जी.सी. योजना) वेतनश्रेणी १.१.२००६ पासून लागू करण्याचा निर्णय घेतला" असे कळविले. मंत्रिमडळाने घेतलेल्या निर्णयानुसार व शासननिर्णयानुसार **आश्वासित प्रगति योजना (CAS) केंद्राप्रमाणे महाराष्ट्रात २३ जुलै रोजी निर्णय घेऊन मंत्रिमंडळाने जशीच्या तशी लागू केली** असतांना २४ जुलै २००९ च्या किंवा ३१ जुलै २००९ च्या उपरोक्त पत्रांमध्ये एका अक्षराने त्याबाबतचा उल्लेख या अधिकाऱ्याने केलेला नाही.

चौथ्या वेतन आयोगाच्या वेळी मा. श्री.शरदराव पवार हे राज्याचे मुख्यमंत्री असतांना त्यांनी महासंघाच्या कार्यकारी मंडळाशी सतत ५ दिवस चर्चा करुन दिनांक १८ जानेवारी १९८९ रोजी नोंदलेले मतैक्यपत्र ***(सहपत्र : आठ)*** तयार केले होते. या मतैक्य पत्रातील समग्र योजनेच्या उल्लेखामुळे आश्वासित प्रगती योजना (**CAS**) त्यावेळी जशीच्या तशी लागू झाली होती. पाचव्या वेतन आयोगाच्या वेळी तत्कालीन उच्च शिक्षणमंत्री श्री. दिलीपराव वळसे पाटील यांची महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा करून दिनांक ७ डिसेंबर १९९९ रोजी जे मतैक्यपत्र***(सहपत्र : नऊ)*** तयार केले होते त्यामध्ये सुद्धा आश्वासित प्रगती योजनेचा स्पष्ट उल्लेख होता. ही बाब वस्तुतः २४ जुलै २००९ च्या पत्रावर प्रतिक्रिया व्यक्त करणारा ३२ परिच्छेदांचा एक तपशिलवार ठराव या महासंघाच्या कार्यकारी मंडळाने दिनांक २६ जूलै २००९ च्या बैठकीत सम्मत केला होता व त्याची प्रत***(सहपत्र : दहा)*** शासनाला तातडीने देण्यात आली होती. या ठरावाच्या परिच्छेद १६ व १७ मध्ये आश्वासित प्रगती (CAS) योजनेबाबतची उपरोक्त ***सहपत्र : आठ व नऊ*** मधील माहिती तपशिलाने नमूद करण्यात आली होती. या सर्व बाबी लक्षात आणून दिल्यानंतरसुद्धा व मंत्रिमंडळाने २३ जुलै २००९ रोजी तसा निर्णय घेतलेला असतांना सुद्धा ३१ जुलै २००९ च्या पत्रामध्ये***(सहपत्र : पाच)*** आश्वासित प्रगती योजनेबाबत (CAS) एका ओळीचासुद्धा उल्लेख नव्हता. असा अनुल्लेख ***मंत्रिडळाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना करणारा, शासननिर्णयात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा, सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा आहे, आणि;***

## महाराष्ट्र विधानमंडळ

***विधान भवन बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई-४०० ०३२***

**क्रमांक १४५११/म.वि.स./५-१० : दिनांक ७.४.२०१०**

**प्रेषक :**
प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
**प्रति,**
मा. उच्च व तंत्रशिक्षण मंत्री, महाराष्ट्र शासन, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय :-** सन्माननीय विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख यांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या विरोधात दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना....

महोदय,

प्रा.बी.टी.देशमुख, सन्माननीय विधानपरिषद सदस्य यांनी प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचेविरुद्ध दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली असून मा. सभापती, विधानपरिषद यांना हक्कभंगाबाबत निर्णय घेणे सूकर होण्यासाठी **सूचनेमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबतचा प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय यांचा लेखी खुलासा प्राप्त करुन घेऊन तो आपल्या अभिप्रायांसह कृपया तात्काळ या सचिवालयास सादर करावा** अशी आपणांस निदेशानुसार विनंती करण्यात येत आहे.

आदरपूर्वक

आपला
**(भाऊसाहेब कांबळे)**
सहसचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

प्रत माहितीसाठी : प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

** AF : P 99 **

**ज्याअर्थी,** मंत्रिमंडळाने २३ जुलै २००९ रोजी घेतलेल्या त्या निर्णयाप्रमाणे अनुषंगिक लाभाबाबत "विद्यापीठीय व महाविद्यालयीन शिक्षकांना सध्या जे चालु आहेत ते किंवा शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे यापैकी जे फायदेशीर असतील ते अनुषंगिक लाभ चालु रहातील" असे ठरले होते. हा निर्णय पुढे १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ८ ब मध्ये नमूद आहे. ***(सहपत्र : अकरा )*** मंत्रिमंडळाने २३ जुलैला घेतलेल्या या निर्णयाच्या विरोधात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या अध्यक्षांना दिलेल्या ३१ जुलै २००९ च्या पत्रातील ***(सहपत्र : पाच )*** **"अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे." असा उल्लेख** ***मंत्रिडळाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना करणारा, शासननिर्णयात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा, सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा आहे, आणि;***

**ज्याअर्थी,** मंत्रिमंडळाने २३ जुलै २००९ रोजी घेतलेल्या निर्णयाप्रमाणे निघालेल्या १२ ऑगस्ट २००९ च्या शासननिर्णयाच्या परिच्छेद ८ ब मध्ये स्पष्टपणे पुढील प्रमाणे तरतुद आहे. :- "8 (B) Following allowances and benefits shall be at par with the state government employees. However for those areas where the teachers are already drawing more allowances or enjoying more benefits than the state government employee (even after the 6th pay commission) the higher rates and / or benefits shall continue i.e. **the teachers shall continue to get whichever is higher** (existing rates and benefits or as per state government employees after 6th pay commission.)" असे असतांना व १२ ऑगस्ट २००९ चा उपरोक्त शासननिर्णय ***(सहपत्र :दोन )*** निर्गमित झाल्यानंतरसुद्धा दिनांक १५ ऑगस्टच्या अनेक वृत्तपत्रांमध्ये

# विधिवतरित्या नेमण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांचे वेतन अदा न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०१० : पहिले अधिवेशन, २०१०*

(२५) * २६४३ **दिलीपराव सोनवणे , प्रा.बी.टी.देशमुख, श्री.वसंतराव खोटरे, श्री. विक्रम काळे** : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विद्यापीठ अनुदान आयोगाने १४ जून, २००६ रोजी अधिव्याख्याता पदासाठीच्या किमान पात्रतेविषयीची 'दुसऱ्या दुरुस्तीची अधिसूचना' अधिसूचित केली असून नवीन अधिसूचना जोपर्यंत निर्गमित होत नाही तोपर्यंत १४ जून २००६ ची अधिसूचना अस्तित्वात राहील, असे विद्यापीठ अनुदान आयोगाने राज्याच्या उच्च शिक्षण सचिवांना दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ रोजी पत्र पाठवून कळविले हे खरे आहे काय,

(२) शासनाकडून किंवा उच्च शिक्षण संचालनाकडून कोणतेही आदेश नसतांना विधिवतरित्या निवडसमिती मार्फत निवड झालेल्या व मा.कुलगुरुंची मान्यता असलेल्या अधिव्याख्यात्यांचे वेतन अनुदान अदा करण्यास दिनांक २६ जून २००९ च्या पत्रान्वये सहसंचालक उच्च शिक्षण, अमरावती विभाग अमरावती यांनी नकार दिला हे ही खरे आहे काय,

(३) सन २००९ ची तिसरी सुधारणा अधिसूचीत होण्यापूर्वी सन २००६ च्या दुसऱ्या सुधारणा अधिसूचनेप्रमाणे सेवेत भरती झालेले सर्व अधिव्याख्याते हे संरक्षणास पात्र आहेत, असा स्पष्ट निर्णय मा.मुंबई उच्च न्यायालयाने दिनांक १८ नोव्हेंबर, २००९ रोजी ९६२९ ऑफ २००९ या प्रकरणात दिला असून ह्या सर्व बाबी महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाच्या सहसचिवांनी दिनांक २७ नोव्हेंबर, २००९ रोजी किंवा त्यादरम्यान सहसंचालक, उच्च शिक्षण अमरावती विभाग अमरावती यांच्या मार्फत एक निवेदन देऊन मा.उच्च शिक्षण मंत्री यांच्या लक्षात आणून दिल्या हे खरे आहे काय,

(४) असल्यास, याबाबत शासनाने काय कारवाई केली,

(५) अद्याप कारवाई केली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री.राजेश टोपे** : (१) व (२) विद्यापीठ अनुदान आयोगाने दिनांक १४ जून, २००६ रोजी अधिसूचना निर्गमित करुन एम.फिल. पदवीधारकांना विद्यापीठ व महाविद्यालयीन अधिव्याख्याता पदांसाठी पात्र ठरविले. त्यानुसार राज्य शासनाने दिनांक ५.९.२००६ च्या पत्रान्वये सदर अधिसूचना राज्यातील अधिव्याख्यातांना लागू राहील असे विद्यापीठांना कळविले. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४ जून, २००६ रोजीच्या अधिसूचनेविरुद्ध मा.उच्च न्यायालयात याचिका क्र.४२६६/०६ अन्वये याचिका दाखल करुन पीएच.डी. व एम.फिल या शैक्षणिक अर्हता रद्द करण्याबाबत न्यायालयास विनंती केली. त्यानुसार मा.उच्च न्यायालयाने दिनांक ६ मार्च, २००७ रोजी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या दिनांक १४ जून, २००६ च्या अधिसूचनेस स्थगिती दिली. सदर स्थगिती आदेश विचारात घेऊन राज्य शासनाने दिनांक ५.९.२००६ च्या पत्रास दिनांक ६ जुलै, २००७ च्या पत्रान्वये स्थगिती दिलेली आहे.

मा.उच्च न्यायालयाने उक्त याचिका क्र.४२६६/०६ मध्ये दिनांक २७-११-२००८ रोजी अंतिम आदेश दिलेले असून त्यामध्ये असे स्पष्ट केले आहे की, अधिव्याख्याता पदासाठी किमान शैक्षणिक अर्हतेबाबत मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दिनांक १२.११.२००८ च्या आदेशातील तरतूदी विचारात घेऊन विद्यापीठ अनुदान आयोगाने एक महिन्याच्या आत नियम विहित करावेत. मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दिनांक १२-११-२००८ च्या आदेशामध्ये अधिव्याख्याता पदासाठी एम.फिल.पदवीधारकांना पात्र ठरविलेले नाही.

दरम्यान विद्यापीठ अनुदान आयोगाची दिनांक १४ जून, २००६ ची अधिसूचना अंमलात आहे किंवा कसे याबाबत काही शिक्षक वर्गाकडून शासनाकडे विचारणा करण्यात आली. त्या अनुषंगाने राज्य शासनाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे विचारणा केली असता विद्यापीठ अनुदान आयोगाने अधिव्याख्याता पदाच्या अर्हतेबाबत नविन विनियम निर्गमित होत नाही तोपर्यंत दिनांक १४ जून, २००६ ची अधिसूचना अंमलात राहील, असे दिनांक २४-२-२००९ च्या पत्रान्वये कळविले आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाशी विचारविनिमय सुरु आहे. तसेच या संदर्भात मा.उच्च न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या अवमान याचिका क्र.६०/२००९ मध्ये असे स्पष्ट आदेश दिले आहेत की, In this view of the matter, respondent no.1 and 2 are directed immediately to place on record as to the status of the file of the approval sent to the Central Government and also inform with whom the matter is pending. By no means the regulation which was considered by this Court liable for stay, can be enforced, taking shelter that no approval for new regulation has been obtained.

मा.उच्च न्यायालयाचे आदेशानुसार विद्यापीठ अनुदान आयोगाने मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या दिनांक १२-११-२००८ च्या आदेशातील तरतूदी विचारात घेऊन अधिव्याख्याता पदासाठी किमान शैक्षणिक अर्हतेबाबत दिनांक १ जून, २००९ रोजी अधिसूचना निर्गमित केली असून, सदर अधिसूचना दिनांक ११-७-२००९ रोजी केंद्र शासनाच्या राजपत्रात प्रसिद्ध करण्यात आलेली आहे. त्यामध्ये सुद्धा अधिव्याख्याता पदासाठी एम.फिल. पदवीधारकांना पात्र ठरविण्यात आलेले नाही.

दिनांक १४ जून, २००६ ते दिनांक ६-३-२००७ आणि दि.२७-११-२००८ ते आजपर्यंत एम.फिल. पदवीच्या आधारे अधिव्याख्याता पदावर नियुक्त करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या कायदेशीर, नियमित व विहित अर्हताप्राप्त आहेत किंवा कसे याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त करुन पुढील निर्णय घेणे आवश्यक आहे. त्यामुळे याबाबत विधी व न्याय विभागाचे अभिप्राय प्राप्त झाल्यावर पुढील निर्णय घेतला जाईल.

(३), (४) व (५) होय. सह संचालक, उच्च शिक्षण, अमरावती विभाग, अमरावती यांना निवेदन प्राप्त झाले आहे.

मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल झालेल्या याचिका क्र.९६२९/२००९ च्या अनुषंगाने विद्यापीठ अनुदान आयोगाच्या सन २००६ च्या दुसऱ्या सुधारणा अधिसूचनेप्रमाणे नियुक्त करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा समाप्त करण्यास मा.उच्च न्यायालयाने अंतरीम स्थगिती आदेश दिले आहेत. सदर प्रकरण न्यायप्रविष्ट असून या प्रकरणी विधी व न्याय विभागाचे अभिप्राय घेण्यात येत आहेत.

प्रधानसचिवांनी लक्षावधी रुपये खर्च करुन दिलेल्या जाहिरातीमध्ये "**अनुषंगिक लाभ राज्य शासकीय कर्मचाऱ्यांप्रमाणे लागू करण्याचा निर्णय घेतला आहे.**" ***(सहपत्र : बारा)* असा करण्यात आलेला उल्लेख**, प्रधानसचिवांच्या बेजबाबदारपणाचा एक फार मोठा नमूना होय. ज्याचे समर्थन कोणालाही करता येणे शक्य नाही. मा. उच्च शिक्षणमंत्र्यांना सुद्धा अधिकाऱ्यांची ही चुक झालेली आहे हे दिनांक २२ डिसेंबर २००९ रोजी सभागृहात मान्य करावे लागले ते पुढील शब्दात :- "**सभापती महोदय, निश्चितप्रकारे ही चूक झालेली आहे, हे मी मान्य करतो. जी.आर. आणि जाहिरातीमध्ये काही फरक निर्माण झाला त्यामुळे काही चुकीचा संदेश जाण्याची शक्यता निर्माण झाली. त्यामुळे संपकऱ्यांच्या भावना सुध्दा दुखावल्या हा एक विषय मी मान्य करतो.**"***(सहपत्र : तेरा) या अनेक जाहिरातीमधील उपरोक्त उल्लेख मंत्रिडळाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना करणारा, शासननिर्णयात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा, सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा आहे, आणि;***

**ज्याअर्थी, नेटसेट ही पात्रता नसलेल्या अधिव्याख्यात्यांच्या बाबतीत विद्यापीठ अनुदान आयोगाने** ७ व ८ ऑक्टोबर २००८ रोजीच्या बैठकीत धोरणात्मक निर्णय घेतला. तो पुढील प्रमाणे :- "**The Commission was of the view that since no NET qualified/NET exempted candidate was available at the time of interview and had continued service of 5 or more years the NET / SLET qualification is relaxed in respect of the following candidates for appointment as Lecturer with the following conditions :-** (i) That the recommended exempted candidate should have been selected by a duly constituted Selection Committee. (ii) The constitutional provisions of reservation for SC/ST etc. are followed in these selections." ***(सहपत्र : चौदा)*** त्यानंतर **विद्यापीठ अनुदान आयोगाचा हा धोरणात्मक निर्णय** मा. उच्च शिक्षणमंत्र्यांनी स्वतः पुढील शब्दात १७ डिसेंबर २००८ रोजी विधानपरिषद सभागृहात सांगितला :-"विद्यापीठ अनुदान

# संगणकशास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिली जाणारी भेदभावपूर्ण वागणूक

*महाराष्ट्र विधानपरिषद : गुरुवार, दिनांक १ एप्रिल, २०१० : पहिले अधिवेशन, २०१०*

(५) * २६३५ **श्री.दिलीपराव सोनवणे , प्रा.बी.टी.देशमुख , श्री.वसंतराव खोटरे , श्री.विक्रम काळे** : तारांकित प्रश्न क्रमांक ५०१६६ ला दिनांक ४ जून, २००९ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय उच्च व तंत्रशिक्षण मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पदवी स्तरावरील अनुदानप्राप्त विज्ञान शाखेअंतर्गत शिकविल्या जाणाऱ्या संगणक शास्त्र या वैकल्पिक विषयाला अनुदान देतांना दिल्या जाणाऱ्या भेदभावपूर्ण वागणूकीबावत मा.उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिलेल्या निर्णयाप्रमाणे कारवाई करण्याच्या विचाराधीन प्रश्नावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ,

(३) अद्याप कोणतीच कारवाई झालेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**प्रा. वर्षा गायकवाड, श्री. राजेश टोपे यांच्याकरिता :** (१) नाही.

(२), (३) याबाबत शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

**श्री. दिलीपराव सोनवणे :** सभापती महोदय, संगणकशास्त्र हा विषय वैकल्पिक विषय म्हणून असल्यानंतर १९९१ अगोदर ज्या संस्थांनी हा विषय सुरु केला होता त्यांना तो अनुदानावर देण्यात आला आणि १९९१ नंतर मात्र कायम विनाअनुदान तत्वावर दिलेला आहे. १९९१ नंतरच्या कायम स्वरुपी विनाअनुदान तत्वावर असलेल्या काही संस्थांना हा विषय अनुदानावर देण्यात आलेला आहे मात्र काही संस्थांना तो अद्यापपर्यंत अनुदानावर दिलेला नाही. तेव्हा ज्या संस्थांवर अशा प्रकारचा अन्याय झालेला आहे त्या संस्थांना हा विषय अनुदानावर देण्यात येईल काय?

**प्रा. वर्षा गायकवाड :** सभापती महोदय, सन्माननीय सदस्यांनी जो प्रश्न विचारलेला आहे त्याबाबतीत शासनस्तरावर कार्यवाही चालू आहे आणि त्याबाबतीत लवकरात लवकर निर्णय घेण्यात येईल.

**प्रा. बी. टी. देशमुख :** सभापती महोदय, 'शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे, हे उत्तर नॉर्मली बरोबर आहे पण हायकोर्टाने निर्णय दिल्यानंतर सुध्दा दोन दोन वर्षे ही कार्यवाही चालूच आहे हे बरोबर नाही. सभापती महोदय, मी आपली परवानगी मागतो. सभागृहाची वेळ घेण्याची माझी कधीच ईच्छा नसते पण माननीय उच्च न्यायालयाच्या खंडपीठाने २००७ च्या याचिका क्रमांक ९९८ मध्ये दिनांक २६ नोव्हेंबर, २००७ मध्ये निकाल दिलेला आहे. त्यामध्ये असे म्हटलेले आहे की, 'However, if the State Government has granted permission to some colleges and institutions to start the above subject on No Grant Basis, in that case, we permit the Petitioner to make representation in this regard to the State Government within a period of four weeks from today and if such representation is made, the State Government is directed to take decision on merit, according to the Law and Procedure applicable in this regard, within a period of 8 weeks of the date of such representation.' सभापती महोदय, माननीय उच्च न्यायालयाने निर्णय दिला. दि.२६ नोव्हेंबर, २००७ रोजी त्या संस्थेने आपल्याकडे दि.१९-१२-२००७ रोजी रिप्रेझेंटेशन किंवा निवेदन आपणास सादर केलेले आहे. त्यानंतर आठ आठवडयाच्या आत शासनाने याबाबतचा निर्णय घ्यावयाचा होता पण तसा तो घेतला नाही. सभागृहामध्ये याबावतीत काय निर्णय घेण्यात येणार आहे, सांगण्यात आले आहे. २३ भेदभावाचे मुद्दे त्या निवेदनामध्ये आपल्या लक्षात आणून दिले, हे खरे आहे काय ? असा प्रश्न विचारला असता आपण 'होय' अशा पध्दतीचे उत्तर दिलेले आहे. शासनाने केवळ 'होय' असे उत्तर दिलेले नाही तर सभागृहामध्ये २३.१२.२००८ रोजी माननीय मंत्रिमहोदयांनी सभागृहात असे सांगितले की, 'पुढच्या अधिवेशनाच्या अगोदर हा विषय उच्च शिक्षण विभागाकडून मंत्रिमंडळाच्या बैठकीत मान्यतेसाठी आणला जाईल आणि पुढील अधिवेशनाच्या अगोदर या विषयाच्या संदर्भात सकारात्मक निर्णय घेतला जाईल, पण तसा निर्णय घेतला गेला नाही. सभापती महोदय, त्यानंतर एक ॲफिडेव्हिट शासनाच्या वतीने कोर्टामध्ये करण्यात आले. त्यावर कोर्टाने निर्णय दिलेला आहे. खरे म्हणजे हे सचिवांचे काम असते. दुसऱ्या एका प्रकरणामध्ये प्रधान सचिवांना ५० हजार रुपये दंड झाला, तिसऱ्या एका प्रकरणामध्ये त्यांना ५ हजार रुपये दंड झाला. या प्रकरणामध्ये दंड झालेला नाही. परंतु हायकोर्टाने शासनाच्या ॲफिडेव्हिट बाबत जो निर्णय दिला त्यामध्ये असे म्हटले आहे की,

" ....it is mentioned in the affidavit that the proposal of the Petitioners for grant-in-aid could not be decided by the Cabinet/Competent Authority because of imposition of Code of Conduct by the Election Commissioner. It is also mentioned in the affidavit that as soon as period of Code of Conduct comes to an end, issue about extending grant-in-aid to the computer science course run by the Petitioners will be placed before the Cabinet/Competent Authority for necessary consideration and decision.' हायकोर्टाने पुढे असे म्हटले आहे की, 'In the circumstances, we dispose of the writ petition and expect that the decision be taken as early as possible after the period of Code of Conduct comes to an end.' माझे असे म्हणणे आहे की, आपण स्वतः सभागृहामध्ये सांगितले की, आठ आडवड्यांच्या आत आम्ही निर्णय घेऊ. भेदभाव झालेला आहे. निरनिराळे २३ प्रकारचे भेदभाव आहेत. ते भारतीय संविधानाच्या खंड १४ च्या विरुध्द आहे. आपण याबाबतीतील निर्णय आठ दिवसांमध्ये, पंधरा दिवसांमध्ये घेणार काय ?

**प्रा. वर्षा गायकवाड :** सभापती महोदय, जेव्हा आपण या कोर्सला अनुदान दिले होते त्यावेळी तो ऑप्शनल विषय होता. त्यानंतर कॉम्प्युटर सायन्स हा विषय रेग्युलर चालू झाला आहे. त्यानंतर मधल्या काळात कायम विनाअनुदानितचा कायदा आणला. सन्माननीय सदस्यांचा असा प्रश्न आहे की, एका हप्त्यामध्ये निर्णय घेणार काय ? एका हप्त्यामध्ये हा विषय निर्णयासाठी कॅबिनेटपुढे घेऊन जाऊ.

आयोगाच्या दिनांक ५ नोव्हेंबर, २००८ च्या पत्रात नमूद केलेल्या खालील अटीनुसार एकूण ८३७ शिक्षकांना नेट/सेट पात्रतेपासुन सुट देण्यात येत असल्याचे विद्यापीठांस कळविले आहे." *(सहपत्र : पंधरा)* तसेच विद्यापीठ अनुदान आयोगाने ५ नोव्हेंबर २००८ च्या आदेशाने जो धोरणात्मक निर्णय कळविला, त्याबाबतीत मा. उच्च न्यायालयाच्या नागपूर खंडपीठाने Writ Petition Nos. 4266/2006, 5037/08,4486/2007, 4386/07, 4500/07 and 462/2008 या प्रकरणात दिनांक २७ नोव्हेंबर, २००८ रोजी पुढील धोरणात्मक निर्णय दिला :- "**So far as the lecturers, who were in service, from 1991 onwards, the issue of exemption to them is claimed to be covered by the orders passed by the UGC on 5.11.2008 based on the Commission's decision in its meeting dated 7th and 8th October 2008.** If any of the petitioners are governed by this communication dated 5.11.2008 addressed by the UGC to the Registrar of the University concerned, **undoubtedly, their proposals will have to be considered and approved, as per the said decision of UGC.**" *(सहपत्र : सोळा)* त्यानंतर

मा.उच्च शिक्षणमंत्र्यांनी सभागृहात १७ डिसेंबर २००८ रोजी शासनाच्या वतीने पुढील प्रमाणे आश्वासने दिलीत:-

(i) "**सन्माननीय सदस्य प्रा. बी.टी.देशमुख यांनी जे तीन प्रश्न विचारलेले आहे त्याबाबत मी शासनाच्या वतीने सांगू इच्छितो की, या सदर्भात एक जी.आर. काढणे आवश्यक आहे.** तेव्हा या अधिवेशनाचा कालावधी संपण्याच्या अगोदर हा जी.आर. काढण्यात येईल, **जर २४ तारखेला अधिवेशन संपणार असेल तर त्या अगोदर जी. आर. काढण्यात येईल.... तसेच** हे काम **एक महिन्याच्या आत पूर्ण करण्यात यावे अशी सूचना विद्यापीठाला देण्यात येईल.**"*(सहपत्र : सतरा)*

(ii) "हे करिअर ॲडव्हान्समेंट स्कीमच्या संदर्भात हे कॅसचे काम पूर्ण करावयाचे आहे त्यासाठीदेखील कॅम्प्स घेऊन येत्या दोन महिन्यात पूर्ण करावयाचे आहे. अशा प्रकारे हे एकूण सर्वच काम म्हणजे **नियमित करण्याचे काम एक महिन्यात आणि त्यापुढे कॅसचे काम दोन महिन्यात असे तीन महिन्यात पूर्ण करून या सगळ्या प्रश्नांना पूर्णविराम दिला जाईल.**"*(सहपत्र : सतरा)*

महाराष्ट्र शासनाच्या वतीने मा. उच्च शिक्षणमंत्री व मा. मुख्य सचिव यांची मंत्रालयातील मा. मुख्य सचिवांच्या दालनात महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाशी चर्चा होऊन निरनिराळ्या मुद्यांवर जे मतैक्य झाले, ते त्याच दिवशीच्या म्हणजे २६ ऑगस्ट २००९ च्या इतिवृत्तामध्ये *(सहपत्र : अठरा)* नोंदण्यात आले आहे. त्यातील ५ व्या मुद्यात पुढील मजकूर आहे. :-

"**नेट/सेट अर्हतेमधून सूट देण्याचे व नियमित सेवा कधीपासून ग्राह्य धरण्यात यावी, याबाबतचे सर्वतोपरी अधिकार विद्यापीठ अनुदान आयोगास आहेत. याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाचा निर्णय अंतिम राहील** याबाबत विद्यापीठ अनुदान आयोगाकडे समन्वय करण्यासाठी शासनाचे दोन अधिकारी व एमफुक्टोचे दोन प्रतिनिधी यांची एक समिती पाठपुराव्यासाठी नेमली जाईल. याबाबत इतर कार्यवाही शासन पत्र दिनांक ३१ जुलै, २००९ व ४ ऑगस्ट, २००९ च्या पत्रातील परिच्छेद (३) मध्ये नमूद केल्याप्रमाणे करण्यात येईल." तसेच यापुढे करावयाच्या कारवाई बाबत ३१ जुलै *(सहपत्र : पाच)* व ४ ऑगस्ट*(सहपत्र : सहा)* २००९ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र प्राध्यापक महासंघाला पुढील प्रमाणे आश्वासने देण्यात आली आहेत. :-

(१) राज्य शासन विद्यापीठ अनुदान आयोगाला व केंद्र शासनाला प्रलंबित प्रकरणे त्वरीत निकाली काढण्यासाठी विनंती करील. आवश्यकता पडल्यास याचा पाठपुरावा करण्यासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे जबाबदारी देऊन सदर प्रलंबित कामे त्वरीत पूर्ण करुन घेण्यात येतील.

(२) विद्यापीठ अनुदान आयोगाकडून सुट मिळाल्याचे पत्र विद्यापीठास प्राप्त झाल्याच्या दिनांकापासून शक्यतो ३० दिवसांच्या आत ती प्रकरणे निकाली काढण्यासाठी आवश्यकतेप्रमाणे शिबीर आयोजित करुन कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(३) **विद्यापीठ अनुदान आयोग जी तारीख नमूद करेल, त्या तारखेपासून सुट देण्यात येईल.**

(४) विद्यापीठ अनुदान आयोगाने सुट देण्यासंदर्भातील छाननीचे बरेचसे कामकाज त्यांच्या स्तरावर पूर्ण केले असल्याचे कळते.

(५) विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयांमध्ये सन १९९१-९९ या कालावधीत विगर **नेट/सेट अधिव्याख्याता / शिक्षकांच्या प्रकरणांचा केंद्रशासन / यु.जी.सी.कडे पाठपुरावा करण्यासाठी एक तदर्थ समिती गठीत करण्यात येईल. आणि;**

ज्याअर्थी, मंत्रिमहोदयांनी सभागृहात घेतलेल्या भूमिकेच्या विरुद्ध तसेच पत्रातून शासनाने महासंघाला कळविलेल्या भूमिकेच्या विरुद्ध प्रधानसचिव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयांत जावून कारस्थाने करीत होते असे स्पष्टपणे दिसून येते. "१८ ऑगस्ट २००९ या तारखेला राज्य शासनाचे आम्ही तीन अधिकारी विद्यापीठ अनुदान आयोगाच्या कार्यालयात येवून गेलो व

# महाराष्ट्र विधानमंडळ

*विधान भवन बॅकबे रेक्लमेशन, विधानभवन मार्ग, मुंबई-४०० ०३२*

**क्रमांक २०५३५/म.वि.स./३-१०**

**दिनांक ५.५.२०१०**

**प्रेषक :**

प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

**प्रति,**

मा. सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई-३२

**विषय :**- सन्माननीय विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख तसेच श्री. वसंतराव खोटरे यांनी मा. सामाजिक न्याय मंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्या विरोधात दिलेली विशेषाधिकार भंगाची सूचना....

महोदय,

सन्माननीय विधानपरिषद सदस्य प्रा.बी.टी.देशमुख, तसेच श्री. वसंतराव खोटरे यांनी आपल्या विरुद्ध दिलेल्या विशेषाधिकार भंगाच्या सूचनेची प्रत सहपत्रांसह सोबत जोडली असून मा. सभापती, विधानपरिषद यांना हक्कभंगाबाबत निर्णय घेणे सूकर होण्यासाठी **सूचनेमध्ये उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबतचा आपला लेखी खुलासा कृपया तात्काळ या सचिवालयास सादर करावा** अशी आपणांस निदेशानुसार विनंती करण्यात येत आहे.

आदरपूर्वक

आपला

**(भाऊसाहेब कांबळे)**

सहसचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय

** AF : P 101

# *महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,*

तात्काळ

***क्रमांक : २००९/(३५९/०९)-विशि -१, मंत्रालय, मुंबई ४०००३२.***

***दिनांक : ७ सप्टेंबर, २००९.***

प्रति,

संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.

**विषय :** एमफुक्टो या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत दि. २६-०८-२००९ रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महोदय,

राज्यातील अकृषि विद्यापीठ व महाविद्यालयातील शिक्षकांना सुधारीत वेतन संरचना लागू करणे व इतर मागण्यांच्या अनुषंगाने एमफुक्टो या शिक्षकांच्या संघटनेने माहे जुलै, ऑगस्ट मध्ये संप पुकारलेला होता. सदर संपाच्या अनुषंगाने एमफुक्टो संघटनेचे प्रतिनिधी, मा. मुख्य सचिव, प्रधान सचिव (उच्च व तंत्र शिक्षण) व संचालक, उच्च शिक्षण यांची मा. मंत्री (उच्च व तंत्र शिक्षण) यांच्या समवेत दिनांक २६-०८-२००९ रोजी अंतिम बैठक झाली. सदर बैठकीचे कार्यवृत्त सोबत जोडले आहे.

सदर कार्यवृत्तातील मुद्दा क्र. ५ मध्ये नमुद केल्याप्रमाणे आपल्या स्तरावर एक समिती गठीत करुन पुढील कार्यवाही करावी तसेच मुद्दा क्र. १० मध्ये नमुद केल्यानुसार सर्व विभागीय सहसंचालक व आपल्या स्तरावर कार्यवाही करावी.

आपला

**(विकास तु. कदम)**

कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

** AF : P 93 **

तेथे आपणास काय सांगितले?" हे २४ ऑगस्ट २००९ रोजी पत्र ***(सहपत्र : एकोनविस )*** लिहून विद्यापीठ अनुदान आयोगाला त्यापैकी एका अधिकाऱ्याने कळविले आहे. २४ ऑगस्ट २००९ च्या या पत्रामध्ये (No. UGC 2009(332/09)UNI-I, Higher & Technical Education Department, Mantralaya, Mumbai-400 032.) या अधिकाऱ्यांनी मांडलेली भूमिका ही पूर्णपणे मा. मंत्रिमहोदयांच्या भूमिकेच्या विरोधात आहे. या पत्रातील बहुतांशी मजकुर ***सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा, मंत्रिमहोदयांच्या आश्वासनात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा आहे, आणि;***

**ज्याअर्थी,** मंत्रिमंडळाने निर्णय घेतल्यानंतर १२ ऑगस्ट २००९ चा शासननिर्णय निर्गमित करतांना मुद्दाम उच्च शिक्षण क्षेत्रामध्ये गोंधळाचे वातावरण निर्माण होईल अशा प्रकारची शब्दरचना शासननिर्णय निर्गमित करतांना प्रधानसचिवांनी हेतुपूर्वक वापरलेली दिसते. उदाहरणार्थ शासननिर्णयातील ***(सहपत्र : वीस)*** परिच्छेद १४ पुढील प्रमाणे आहे. :-

"(14) This Government Resolution is **subject to** the decision taken by the State Government on the scheme forwarded by Government of India by its letter dated 31/12/2008. Therefore, anomalies, if any may be brought to the notice of the Department of Higher and Technical Education, Government of Maharashtra through proper channel."

"मंत्रिमंडळाचा निर्णय काहीतरी वेगळा आहे व त्याप्रमाणे या शासननिर्णयात पुढे बदल होवू शकतात, आजचा हा शासननिर्णय अंतिम नाही" असा स्पष्ट अर्थ "**subject to**" या शब्दाच्या वापराने विदित होतो. "**according to**" असा शब्द वापरल्याबरोबर "**हा शासननिर्णय मंत्रिमंडळाच्या निर्णयाप्रमाणेच काढण्यात आलेला आहे." असा स्पष्ट अर्थ ध्वनित होतो.** १२ ऑगस्ट, २००९ चा शासन निर्णय हा राज्य शासनाचा शासननिर्णय आहे, त्यात निश्चितता ही ओघानेच आली, त्यात "subject to" मुळे येणारी अनिश्चितता घुसविण्याचे काहीच कारण नसतांना या शासन निर्णयात, एक तर जाणिवपूर्वक ही "subject to" अशी शब्दयोजना करुन, संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला असे म्हणावे लागते अथवा आंग्ल भाषेची अपुरी जाण असणे, हे दुसरे कारण असु शकते. ह्यात बहुधा पहिली शंका अधिक संभवते. त्यामुळेच वापरलेल्या "subject to" च्या जागी "according to" अशी शब्दरचना दि. २६ ऑगस्ट, २००९ रोजीच्या इतिवृत्तात ***(सहपत्र : अठरा)*** करावी लागली. शासननिर्णयातील "subject to" हा उल्लेख ***सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना करणारा, अशा निर्णयात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा आहे, आणि;***

**ज्याअर्थी,** केंद्राच्या समग्र योजनेतसुद्धा "**रजेच्या नियमात नंतर बदल करा, सध्या नियम आहे तसे चालू द्या**" अशा अर्थाच्या सूचना नव्हत्या. "शासन निर्णयातील परिच्छेद ८ (ब) मधील तिसऱ्या ओळीतील Benefits या शब्दानंतर "Including leave package" हा शब्द समाविष्ट करण्यात यावा." ह्या गोष्टीवर उभयपक्षी मतैक्य २६ ऑगस्ट २००९ रोजी झाले. त्याची नोंद मतैक्याच्या इतिवृत्ताच्या परिच्छेद ४ मध्ये ***(सहपत्र : अठरा )*** आहे. ही नंतरची गोष्ट झाली. त्यापूर्वी प्रधान सचिवांनी आपल्या तिसऱ्या म्हणजे ४ ऑगस्ट २००९ च्या पत्रात ***(सहपत्र : सहा )*** "**(ii) रजांबाबत (Leave Package) सध्या अस्तित्वात असलेले नियम पुढील निर्णय होईपर्यंत लागू राहील.**" असे कळविले होते. "**पुढील निर्णय होईपर्यंत**" या शब्दरचनेमुळे मंत्रिमहोदयांनी दिलेली आश्वासने पायदळी तुडवून रजाविषयक नियमात सचिव आक्रमक बदल करण्याचा काही तरी कार्यक्रम आखत आहेत अशी तीव्र संतापाची भावना सर्वत्र निर्माण झाली. वस्तुतः २३ तारखेलाच मंत्रिमंडळाने निर्णय घेतला होता व त्याप्रमाणे शासननिर्णयात पुढे परिच्छेद ८ ब समाविष्ट करण्यात आला. रजाविषयक नियम हे अनुषंगिक लाभाचाच एक भाग असल्याने "**पुढील निर्णय होईपर्यंत**" हा ४ ऑगस्ट २००९ रोजीच्या पत्रातील उल्लेख आगीत तेल ओतणारा ठरला. तिसऱ्या पत्रातील हा उल्लेख ***सभागृहात दिलेल्या आश्वासनाची पायमल्ली करणारा, मंत्रिमंडळाने घेतलेल्या निर्णयाची अवहेलना करणारा, शासन निर्णयात स्पष्टपणे नमूद असलेल्या निर्णयांचा अधिक्षेप करणारा आहे, आणि;***

**ज्याअर्थी,** प्रत्यक्षात लोकशाहीप्रणालीचे धिंडवडे काढण्याची ही मोहिम प्रधान सचिव, उच्च शिक्षण यांच्याच नेतृत्त्वाखाली सुरु होती हे स्पष्ट आहे. वेतनश्रेण्याबाबत व नेटसेटबाबत विधानपरिषद सभागृहात दिलेल्या आश्वासनाची अम्मलबजावणी करण्याच्या दृष्टीने शिक्षणमंत्र्यांशी ज्या विविध चर्चा झाल्या, त्यातील आंदोलन काळातील शेवटची चर्चा दिनांक २६ ऑगस्ट २००९ रोजी झाली. शासनातील राजकीय नेतृत्त्वाच्या प्रती एखादा अधिकारी किती उद्धटपणाने वागू शकतो याची कमाल मर्यादा प्रदर्शित करणारे प्रधान सचिव, उच्च शिक्षण वर्तन आंदोलनाच्या त्या शेवटच्या दिवशी म्हणजे २६ ऑगस्ट २००९ ला पहायला मिळाले. त्यादिवशी ११ वाजेपासून तर ३ वाजेपर्यंत चाललेल्या चर्चेचे नेतृत्व स्वतः मा. उच्च शिक्षणमंत्री करित होते पण या चर्चेत एकदासुद्धा, एक मिनिटासाठी सुद्धा प्रधान सचिव, उच्च शिक्षण उपस्थित राहीले नाहीत. सभागृहात देण्यात आलेल्या आश्वासनाविषयी व अशी आश्वासने देणाऱ्यांविषयी व एकंदरीतच सभागृहातील कामकाजाविषयी तुच्छतेची भावना मनात बाळगणाऱ्या प्रधान सचिवांचे हे एकूण वर्तन त्यांच्या पदाला शोभणारे नव्हते. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी २० ऑगस्ट २००९ रोजी त्यांच्या मंत्रालयातील दालनांत महासंघाच्या कार्यकारी मंडळाला दुपारी २.०० वाजता चर्चेसाठी बोलाविले होते. मा. उच्च शिक्षण मंत्री, अर्थ व विधी विभागाचे सचिव व इतर सर्वजण वेळेवर उपस्थित होते. खुद्द मा. मुख्यमंत्र्यांनी मा. उच्च शिक्षण मंत्र्यासह वेळेवर चर्चेला सुरुवात केली. पण उच्च शिक्षण सचिव मात्र अनुपस्थित होते. ते काही मिनीटांच्या उशिराने सभेत आले व त्याबद्दल त्यांना सर्वासमक्ष मा. मुख्यमंत्र्याकडून 'बोलणी' ऐकावी (खावी) लागली. त्यांचे हे वर्तन अत्यंत आक्षेपार्ह होते,

त्याअर्थी प्रधान सचिव श्री. ज.स. सहारीया यांचे उपरोक्त एकूणच वर्तन सभागृहाच्या विशेषाधिकारांचा भंग करणारे असल्याचे हे प्रकरण विशेष हक्क समितीकडे पाठविण्यात यावे.

**आपले विनित**

**प्रा.बी.टी.देशमुख**

**वसंतराव खोटरे** **विक्रम काळे**

---

*अ.शा.प. क्रमांक : संकीर्ण २००९/(३५९/०९) - विशि-१,*

**मंत्री, उच्च व तंत्र शिक्षण**

**महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबई ४०००३२**

*दिनांक : ३१-३-२०१०*

**विषय** : एमफुक्टो या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत दि. २६-०८-२००९ रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने दि. २६-८-२००९ रोजी एमफुक्टो या संघटनेशी झालेल्या चर्चेमध्ये सामाजिक न्याय विभागांतर्गत कार्यरत असलेल्या शिक्षकांनासुध्दा ६ व्या वेतन आयोगानुसार सुधारीत वेतन संरचना लागू करण्याबाबत आपणांस कळवावे, अशी विनंती एमफुक्टो या शिक्षकांच्या संघटनेने केली आहे. तरी एमफुक्टो संघटनेच्या शिफारशीप्रमाणे पुढील कार्यवाही करण्याची शिफारस आपणास करण्यात येत आहे.

आपला

**(राजेश टोपे)**

प्रति,

श्री. शिवाजीराव मोघे, मा. मंत्री, सामाजिक न्याय, मंत्रालय, मुंबई.

** AF : P 97 **

---

तात्काळ

क्रमांक : संकीर्ण-२००९/(३५९/०९)-विशि -१,

**महाराष्ट्र शासन : उच्च व तंत्र शिक्षण विभाग,**

*मंत्रालय, मुंबई ४०००३२. : दिनांक : ७ सप्टेंबर, २००९.*

प्रति,

उपसचिव, तंत्र शिक्षण, मंत्रालय मुंबई

**विषय** : एमफुक्टो या संघटनेच्या पदाधिकाऱ्यांसोबत दि. २६-०८-२००९ रोजी झालेल्या चर्चेच्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीबाबत.

महोदय,

उपरोक्त विषयाबाबतच्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत जोडली आहे.

२. सदर कार्यवृत्तातील मुद्दा क्र. ९ हा आपल्याशी संबंधित असल्यामुळे याबाबत कृपया आपल्या स्तरावर पुढील कार्यवाही करण्यात यावी, ही विनंती

आपला

**(रा.गो.जाधव)**

उपसचिव, महाराष्ट्र शासन

** AF : P 95 **

**Most** Immediate

**NO. F.l-712010-U.ll**

# GOVERNMENT OF INDIA

## Ministry of Human Resource Development
## Department of Higher Education

**New Delhi, 11th May, 2010.**

To,

The Education Secretaries of all State Governments.

**Subject :-** Reimbursement of financial burden due to implementation of Revised Pay Scales on the basis of 6th Pay Commission recommendations for Teachers and equivalent Cadres in Universities and Colleges from 1 .1.2006.

Sir,

I am directed to say that it has been decided by the competent authority that re-imbursement of 80% of the additional requirement of the State Governments consequent on revision of pay scales of the teachers in universities and colleges under the State Government, in pursuance of this Ministry's letter No.1-3212006-U.IIIU.l(i) dated 31.12.2008, would be applicable only when State Governments implement this Ministry's Scheme of revision of pay of teachers and equvalent cadres in universities and colleges as contained in this Ministry's letter dated 31.12.2008 as a composite package, the applicability of which has been indicated in para 8 (p) (v) of this Ministry's letter dated 31.12.2008, which, inter alia, provides that the Scheme may be extended to universities, colleges and other higher educational institutions coming under the purview of the State overnments receiving substantial financial assistance for its maintenance and operations from the State Governments, provided State Governments wish to adopt and implement the Scheme subject to the following terms and conditions:

(a) Financial assistance from the Central Government to those State Governments opting to revise pay scales of teachers and other equivalent cadre covered under the Scheme shall be limited to the extent of 80% (eighty percent) of the additional expenditure involved in the implementation of the revision of pay scales.

(b) The State Government opting for revision of pay shall meet the remaining 20% (twenty percent) of the additional expenditure involved in revision of pay scales from its own sources.

(c) Financial assistance referred to at (a) above shall be provided for the period from 1.1.2006 to 31.3.2010.

# IN THE HIGH COURT OF JUDICATURE AT BOMBAY

**Civil Appellate Jurisdiction**

## WRIT PETITION NO. 166 OF 2007

1. Shivaji University Shikshak Lokshahi Aghadi Kolhapur and others ..... ***Petitioners***

***V/s*** 1. Union of India & Ors. ..... ***Respondents.***

Mr M.S.Topkar for the petitioners. : Mr. V.P. Malvankar, Assistant Government pleader for the Respondent Nos. 2, 4 and 5

## CORAM : F.I REBELLO AND R.M. SAVANT. JJ

**DATE 16TH MARCH 2007**

By virtue of the Corrigendum dated 3 rd of March 2000, there is amendment to the Government Resolution dated 12th December, 1999. Before the Corrigendum, insofar as selection grade lecturers are concerned, any lecturer in the pay scale of 12000-420-18300, was entitled to get his pay fixed at Rs. 14,940/- on completion of five years service in the selection grade. **By virtue of the Corrigendum only those lecturers who were in the selection pay scale on 01.01.1996, were given benefit and not others.** The result is that the state of maharashtra has started making recoveries of excess amount from the lecturers. Our attention was invited to the judgement of the kerala High Court in O.P. No. 36112 of 2002, dated 20.12.2000, wherein in the similar circumstances, the Kerala High Court issued direction to the central Government and UGC to consider the case of extensions of benefits to such lecturers and pursuant to which now the benefits have been extended in terms of the original G.R. dated 11 th December, 1999 read with the Resolution of the Government of India and UGC we also informed that the similar benefits have been extended to the state of Uttar Pradesh.

2. In the light of above, the State Government of Maharashtra to file affidavit and also forward proposal on similar lines to the union of India and UGC for extending the same or similar benefit to the lecturers in the State of Maharashtra.

3. Issue notice to the Respondent Nos. 1, 3 and 6, returnable four weeks. The notice is waived on behalf of the Respondent nos. 2, 4 and 5. **In the meantime, there is ad interim Relief in terms of prayer clause (d).**

4. Stand over for Four weeks

**F.I Rebello J. : R.M. Savant. J.**

** AF : P 79 **

(d) The entire liability accruing with effect from 1.4.2010 on account of revision of pay scales etc. of university and college teachers shall be met by the State Government opting for revision of pay scales.

(e) Financial assistance from the Central Government shall be restricted to revision of pay scales in respect of only those posts which were in existence and filled up as on 1.I,2006.

(f) State Governments, taking into consideration other local conditions, may also decide in their discretion, to introduce scales of pay higher than those mentioned in this Scheme, or may give effect to the revised bands/scales of pay from a date on or after 1.1.2006; however, in such cases, the details of modifications proposed shall be furnished to the Central Government and Central assistance shall be restricted to the Scheme of pay scales as approved by the Central Government and not to any higher scale of pay fixed by the State Government(s). Further the Central assistance shall be from the actual date of giving effect of revised pay scales.

(g) Payment of Central assistance for implementing this Scheme is also subject to the condition that the entire Scheme of revision of pay scales, together with all the conditions to be laid down by the UGC by way of Regulations and other guidelines shall be implemented by State Governments and Universities and Colleges coming under their jurisdiction as a composite scheme without any modification except in regard to the date of implementation and scales of pay mentioned herein above.

3. Fixation of pay of each category of posts may be done in accordance with the guidelines given in the revised pay rules notified by this Ministry for teachers in Universities and Colleges vide communication No. 1-3212006- U.IIIU.l(i) dated 31.12.2008 and the fixation formula circulated by this Ministry vide communication No. F. 3-112009-U.1 dated 4th June, 2009.

4. Thus as per the terms and conditions of the Ministry's letter dated 31.12.2008, the State Governments are required to implement the scheme as a composite one, including the age of superannuation (mentioned in para 8 (f) of this Ministry's letter dated 31.12.2008), together with all the conditions specified or to be specified by University Grants Commission (UGC) by regulations and other guidelines.

5. Therefore, the State Governments shall have to adopt the scheme including the regulations as may be specified by UGC, for being eligible for appropriate Central assistance. However, it is mentioned that the various allowances other than pay scales, applicable to teachers and equivalent cadres in State Governments shall be governed the respective State Government rules. The reimbursement will be restricted to payment of 80% arrears of the revised pay in the pay band applicable plus Academic Grade Pay (AGP) for the period 1-1-2006 to 31-3-2010. No allowances or pension would be admissible for reimbursement for the above period.

6. This arrear component would be the difference between the pay + DA/additional DA + interim relief, if any, existed prior to 1-1-2006 and the revised pay admissible in t notified by this Ministry for teachers in universities and Colleges, based on the CCS (Revised) Pay Rules, 2008.

7. It is provided in Para 8 (p) (v) (f) of this Ministry's letter dated 31.12.2008, that the State Governments taking into consideration other local conditions may also decide in their discretion, to introduce scales of pay higher than those mentioned in this Scheme. This implies that State Governments cannot make modifications lowering the pay package prescribed by this Ministry. Also after adoption of the Central Scheme as a composite package, the State Government shall be required to furnish detailed calculations in support of its claim for central assistance, in the enclosed proforma.

8. Release of the Central assistance shall be considered by this Ministry in accordance with the provisions of the Scheme only after the State Government have adopted and implemented the scheme as a composite scheme, including adoption of the age of superannuation for those engaged in 'inclass' teaching; and have disbursed the salary based on revised pay scales, and after scrutiny of the detailed proposal as may be received from the State Government.

9. It shall be necessary for the Universities and Managements of colleges to make appropriate changes in their statutes, ordinances, rules, regulations, etc to incorporate the provisions of this Scheme and a copy each of the same may also be furnished to UGC.

10. The detailed proposal for implementation of the Scheme on the lines indicated above, may kindly be formulated immediately and sent to this Department for examination so that Central assistance to the extent indicated above can be sanctioned for the implementation of revised scales of pay.

11. The Scheme applies to teachers in all Universities (including Agricultural Universities) and colleges (excluding Agricultural, Medical and Veterinary Science Colleges) admitted to the privileges of the Universities.

Yours faithfully,
**(V.Umashankar)**
Tel: 23074159

Encl: as above.

Copy to:- **(1)** Secretary, University Grants Commission, Bahadur Shah Zafar Marg, New Delhi. **(2)** Web Master (CMIS), Ministry of Human Resource Development for publication on the website of the Ministry, hosted by the National Informatics Centre.

**(Rajender Kalwani)**
Under Secretary to the Government of India

** FS : P 119 **

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. Dhote D.S., 4C, 'Rajdatta', Mahalaxmi Colony, Near Shankar Nagar, Amravati-444 606. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/ 2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/ 2009-11 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/ 2009-11 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting :**05.06.2010**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

----------------------------------------------------

To,........................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................

..................................................................................